70

1

# बृहन्मुंबई महानगरपालिका

क्र. प्रअ/विनि/२४५६९/साधारण दि. 15-12-17

परिपत्रक

No. CHE/DP/ 68 /GEN
2017-18

विषय - कारखाना परवाना (फॅक्टरी परमिट) संदर्भातील शुल्कांची अनुसूची सुधारित करण्याबाबत.

१. महानगरपालिका ठराव क्र. ८०४ दि. २५.०७.२००२ नुसार सध्या कारखाना परवाना ((फॅक्टरी परमिट) संदर्भातील अनुसूची अंमलात आहे. आता महानगरपालिकेने ठराव क्र.९२५ दि. २३.११.२०१७ नुसार कारखाना परवाना ((फॅक्टरी परमिट) संदर्भातील शुल्क अनुसूची सुधारित करण्यास मंजुरी दिली आहे.

२. कारखाना परवाना शुल्क व नूतनीकरण शुल्काकरिता लागणारी परवानगी ही एक खिडकी योजनेअंतर्गत येत असल्यामुळे आता विभाग पातळीवर फॉर्मसची विक्री बंद करण्यात आली आहे. परिशिष्ट 'ब' मध्ये फक्त विद्यमान दराबददल नमूद करण्यात आले असून प्रस्तावित शुल्कश्रेणीत सदर बाब वगळण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे.

३. तसेच वायूप्रदूषण उपशमन शुल्कवाढीस महानगरपालिकेने ठराव क्र. १०४१ दि. २४.१२.२००९ नुसार स्वतंत्रपणे मंजुरी दिली असल्यामुळे सदर परिशिष्ट वगळण्यात आले आहे.

४. सोबत जोडलेल्या परिशिष्ट 'अ' मध्ये दर्शविल्यानुसार सन २०१७-१८ करिता महानगरपालिकेची मंजुरी प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून सुधारित दरानुसार आकार / शुल्क आकारण्यास, तसेच सन २०१७-१८ नंतर येणा-या पुढील प्रत्येक आर्थिक वर्षात १ एप्रिलपासून रु.५००/- पर्यंतच्या तत्कालीन विद्यमान आकार /शुल्कदरांमध्ये प्रतिवर्षी १०% याप्रमाणे वाढ करुन येणारी रक्कम अपूर्णांकात असल्यास सुधारित शुल्क दर पुढील रुपयाच्या पूर्णांकात व रु. ५००/- पेक्षा अधिक तत्कालीन विद्यमान शुल्कदरात १०% वाढ करुन येणारे सुधारित शुल्कदर पुढील दहा रुपयाच्या पूर्णांकात लागू करण्यास महानगरपालिका ठराव क्र.९२५ दि. २३.११.२०१७ नुसार मंजुरी प्राप्त झाली आहे.

५. तसेच याबाबत पुढील नवीन धोरण निश्चित होईपर्यंत, सुधारित शुल्कसूचीची अद्ययावत माहिती, माहिती व तंत्रज्ञान विभागाकडून सॅप संगणकीय प्रणालीमध्ये वेळोवेळी अद्ययावत करण्यात यावी.

६. सदर शुल्कवाढ महानगरपालिकेच्या मंजूरीच्या दिनांकापासून म्हणजेच दि.२३.११.२०१७ पासून अंमलात येईल. तसेच दि.२३.११.२०१७ ते सदरहू परिपत्रक निर्गमित केल्याच्या तारखेदरम्यान यापूर्वीच्या दराने शुल्क आकारले असल्यास त्या त्या पक्षकारांकडून नवीन लागू करण्यात आलेल्या सुधारित शुल्काप्रमाणे येणारी रक्कम वसूल करण्यात यावी.

प्रमुख अभियंता
(विकास नियोजन)

मा.आयुक्त यांचे स्वीय सहाय्यक/ अति.आयुक्त (शहर) यांचे स्वीय सहाय्यक/ अति.आयुक्त (प्रकल्प) यांचे स्वीय सहाय्यक / अति.आयुक्त (पश्चिम उपनगरे) यांचे स्वीय सहाय्यक / अति.आयुक्त (पूर्व उपनगरे) यांचे स्वीय सहाय्यक /संचालक (अभियांत्रिकी सेवा व प्रकल्प)/उपायुक्त (अभियांत्रिकी/ उप आयुक्त (विशेष अभियांत्रिकी)/उपायुक्त (अतिक्रमण व निर्मूलन) /उप आयुक्त (परिमंडळ- )/ संचालक (माहिती व तंत्रज्ञान विभाग) /प्रमुख लेखापाल (वित्त)/ प्रमुख लेखापाल (पा.पु.म.नि.)/ उप प्रमुख अभियंता (इ.प्र.) शहर / पूर्व उपनगरे / प.उप.-१ / प.उप.-२ / वि.कक्ष /सहाय्यक आयुक्त (अतिक्रमण निर्मूलन) / सहाय्यक आयुक्त (------------------------) / कार्यकारी अभियंता (वि.नि.) शहर / पूर्व उप. / पी व आर / एच व के / कार्यकारी अभियंता (स्वीय) (वि.नि.)

प्रत माहितीकरिता व पुढील योग्य त्या कार्यवाहीकरिता रवाना.

15/12/2017
प्रशासकीय अधिकारी
(विकास नियोजन)

D:\DP-13-2017\General\Circular .docx

## <u>कारखाना परवाना शुल्क सूची (पर्यावरण छाननी शुल्कासह) मुंबई महानगरपालिका अधिनियम कलम ७९(२)सह कलम ३९० अन्वये</u>

## <u>प्रमुख अभियंता(विकास नियोजन) खाते</u>

<u>परिशिष्ट-अ</u>

| अ. क्र. | अधिनियम कलम | तपशील | विद्यमान शुल्काची श्रेणी मंजुरी क्रमांक व दिनांक मनपा ठराव क्र. ८०४ दि. २५.०७.२००२ | | प्रस्तावित सुधारीत आकार | प्रस्तावित शुल्काची श्रेणी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | चौ.मी.मध्ये क्षेत्र | विद्यमान आकार | | अश्वशक्ती परिक्षेत्रावर आधारीत पर्यावरण छाननीकरिता प्रस्तावित आकार | | वसूल करावयाचे प्रस्तावित एकूण परवाना शुल्क (६+८) व पर्यावरण छाननी आकार |
| | | | | | | विद्यमान | प्रस्तावित | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १. | ४७९(२) सह ३९० | परवाना शुल्क | ० पासून ५० पर्यंत | २१००.०० | ८७८०.०० | प्रति अश्वशक्तीला रु.५/- या दराने पर्यावरण छाननीकरिता आकार (किमान रु.५००/- व कमाल रु ५०,०००/-च्या सापेक्ष) | प्रति अश्वशक्तीला रु.२१/- या दराने पर्यावरण छाननीकरिता आकार (किमान रु.२०९०/- व कमाल रु.२,०८,८७० /-च्या सापेक्ष) | परवान्याकरिता एकूण शुल्क दोहोंची बेरीज गणना केलेले आकार स्तंभ ६+८ |
| | | | ५० च्यापुढे व १०० पर्यत | २६००.०० | १०८७०.०० | | | |
| | | | १०० च्या वर व २००पर्यंत | ३२००.०० | १३३७०.०० | | | |
| | | | २०० च्या पुढे व ३०० पर्यंत | ३६००.०० | १५०४०.०० | | | |
| | | | ३०० च्या पुढे व ४०० पर्यंत | ४२००.०० | १७५५०.०० | | | |
| | | | ४०० च्यापुढे ५०० पर्यंत | ५१००.०० | २१३१०.०० | | | |
| | | | ५०० च्या पुढे ७५० पर्यत | ६५००.०० | २७१६०.०० | | | |
| | | | ७५० च्या पुढे व १००० पर्यत | ७७००.०० | ३२१७०.०० | | | |
| | | | १००० च्या पुढे | ७७००.०० | ३२१७०.०० | | | |
| | | | | अधिक प्रत्येक २५० चौ.मी.करीता अथवा त्यावरील भागाकरिता रु.६००/- | अधिक प्रत्येक २५० चौ.मी.करीता अथवा त्यावरील भागाकरिता रु.२५१०/- | | | |
| | | | | १० वर्षापेक्षा कमी कालावधीकरिता नवीन परवाना देताना परवाना शुल्क आकारले जाईल. | . १० वर्षापेक्षा कमी कालावधीकरिता नवीन परवाना देताना परवाना शुल्क आकारले जाईल. | | | |

| अ. क्र. | अधिनियम कलम | तपशील | विद्यमान शुल्काची श्रेणी | शुल्कांची प्रस्तावित श्रेणी | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| २. | ४७९(२) सह ३९० | नुतनीकरण शुल्क | १०वर्षापेक्षा कमी कालावधीसाठी परवान्याचे नूतनीकरण करताना प्रति वर्षाला किंवा त्याच्या भागाकरिता परवाना शुल्काच्या १/१०<br>टीप:- मूळ परवाना शुल्क म्हणजे नूतनीकरणाच्या वेळी नवीन परवान्याकरिता आकारावयाचे शुल्क ज्यात पर्यावरण शुल्क अंतर्भूत आहे. वरील अनु.क्र.१ मधील कलम ९ प्रमाणे. | १०वर्षापेक्षा कमी कालावधीसाठी परवान्याचे नूतनीकरण करताना प्रति वर्षाला किंवा त्याच्या भागाकरिता परवाना शुल्काच्या १/१०<br>टिप:- मूळ परवाना शुल्क म्हणजे नूतनीकरणाच्या वेळी नवीन परवान्याकरिता आकारावयाचे शुल्क ज्यात पर्यावरण शुल्क अंतर्भूत आहे. वरील अनु.क्र.१ मधील कलम ९ प्रमाणे | |
| ३. | ४७९(२) सह ३९० | हस्तांतरण शुल्क | जर अनुज्ञापन जागेचे हस्तांतरण झाले ( खरेदी करुन अथवा कायदेशीर परंपरेने) तर अनुज्ञापन अथवा परवान्याच्या हस्तांतरणासाठी रु.६००/- | जर अनुज्ञापन जागेचे हस्तांतरण झाले (खरेदी करुन अथवा कायदेशीर परंपरेने) तर अनुज्ञापन अथवा परवान्याच्या हस्तांतरणासाठी रु.२५१०/- | |
| ४. | ४७९(२) सह ३९० | मागणीपत्र जारी केल्यानंतर शुल्काचे विलंबाने अधिदान करतानाचे संयुक्त शुल्क | १) वर अनु.क्र.१,२,३ मध्ये उदृधृत केलेल्या शुल्काचे मागणीपत्राच्या तारखेपासून १५ दिवसात अधिदान केले पाहिजे.<br>२) जर या कालावधीत हे शुल्क प्रदान केले गेले नाही परंतु १५ दिवसांचा वाढीव कालावधी संपल्यानंतर २० दिवसांत प्रदान केले तर मागणी केलेल्या शुल्काच्या ३०% इतक्या संयुक्त शुल्कासह (कंपोझिशन फी) प्रदान केल्यास स्विकारले जाईल.<br>३) जर ते वरील निर्धारित वेळेत म्हणजेच मागणीपत्र जारी केल्यापासून ३५ दिवसांत प्रदान केले नाहीत, परंतु, त्यानंतर केले तर मागणीपत्र जारी केलेल्या तारखेपासून ३ महिन्याचा कालावधी संपण्यापूर्वी केले तर मागणी केलेल्या परवाना शुल्काच्या ४०% इतके संयुक्त शुल्क वसूल केले जाईल.<br>४) मागणीपत्र जारी केल्यानंतर ३ महिने ते १ वर्ष या कालावधीत प्रदान केले तर मागणी केलेल्या परवाना शुल्काच्या ५० % इतके संयुक्त शुल्क वसूल केले जाईल.<br>५) जर हे शुल्क १ वर्षानंतर प्रदान केले गेले तर मागणी केलेल्या परवाना शुल्काच्या १००% इतके संयुक्त शुल्क वसूल केले जाईल. | १)वर अनु.क्र.१,२,३ मध्ये उदृधृत केलेल्या शुल्काचे मागणीपत्राच्या तारखेपासून १५ दिवसात अधिदान केले पाहिजे.<br>२) जर या कालावधीत हे शुल्क प्रदान केले गेले नाही परंतू १५ दिवसांच्या वाढीव कालावधी संपल्यानंतर २०दिवसांत प्रदान केले तर मागणी केलेल्या शुल्काच्या ३०% इतक्या संयुक्त शुल्कासह (कंपोझिशन फी) प्रदान केल्यास स्विकारले जाईल.<br>३) जर ते वरील निर्धारित वेळेत म्हणजेच मागणीपत्र जारी केल्यापासून ३५ दिवसांत प्रदान केले नाहीत, परंतु, त्यानंतर केले तर मागणीपत्र जारी केलेल्या तारखेपासून ३ महिन्याचा कालावधी संपण्यापूर्वी केले तर मागणी केलेल्या परवाना शुल्काच्या ४०% इतके संयुक्त शुल्क वसूल केले जाईल.<br>४) मागणीपत्र जारी केल्यानंतर ३ महिने ते १ वर्ष या कालावधीत प्रदान केले तर मागणी केलेल्या परवाना शुल्काच्या ५० % इतके संयुक्त शुल्क वसूल केले जाईल.<br>५) जर हे शुल्क १ वर्षानंतर प्रदान केले गेले तर मागणी केलेल्या परवाना शुल्काच्या १००% इतके संयुक्त शुल्क वसूल केले जाईल. | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५. | ४७९(२) सह३९० | तात्पुरत्या परवान्याच्या नुतनीकरणासाठी विलंबाने अर्ज केल्यानंतर आकारावयाचे संयुक्त शुल्क | तात्पुरत्या परवानगीसाठी जर अर्ज-<br>अ) कारखान्याचा परवाना संपल्याच्या तारखेपासून १५ दिवसापर्यंत संयुक्त शुल्क वसूल करु नये.<br>ब) वरील (अ) मधील सवलतीची मुदत संपल्यानंतर १५ दिवसांपर्यत नूतनीकरण शुल्काच्या १०% भरावे लागतील.<br>क) वरील (ब) मधील मुदतीपासून २ महिन्यापर्यंत (म्हणजे परवाना संपण्याच्या तारखेपासून ३ महिन्यापर्यंत) नूतनीकरण शुल्काच्या १५% भरावे लागतील<br>ड) ३ महिन्यांनंतर परंतु परवाना संपण्याच्या तारखेपासून ६ महिन्यांपर्यंत नूतनीकरण शुल्काच्या २०% भरावे लागतील.<br>इ) परवाना(कालावधी) संपल्यानंतर ६ महिन्यानंतर, परंतु १ वर्षाच्या आत ५०% इतके संयुक्त शुल्क वसूल केले जाईल व त्यानंतर नुतनीकरण शुल्काच्या १००%` संयुक्त शुल्क वसूल केले जाईल. | तात्पुरत्या परवानगीसाठी जर अर्ज-<br>अ) कारखान्याचा परवाना संपल्याच्या तारखेपासून १५ दिवसापर्यंत संयुक्त शुल्क वसूल करु नये.<br>ब) वरील (अ) मधील सवलतीची मुदत संपल्यानंतर १५ दिवसांपर्यत नूतनीकरण शुल्काच्या १०% भरावे लागतील.<br>क) वरील (ब) मधील मुदतीपासून २ महिन्यापर्यंत (म्हणजे परवाना संपण्याच्या तारखेपासून ३ महिन्यापर्यंत) नूतनीकरण शुल्काच्या १५% भरावे लागतील<br>ड) ३ महिन्यांनंतर परंतु परवाना संपण्याच्या तारखेपासून ६ महिन्यांपर्यंत नूतनीकरण शुल्काच्या २०% भरावे लागतील.<br>इ) परवाना(कालावधी) संपल्यानंतर ६ महिन्यानंतर, परंतु १ वर्षाच्या आत ५०% इतके संयुक्त शुल्क वसूल केले जाईल व त्यानंतर नूतनीकरण शुल्काच्या १००% संयुक्त शुल्क वसूल केले जाईल. | |
| ६. | ४७९(२) सह ३९० | कायमस्वरुपी परवानगीच्या नूतनीकरणाच्या विलंब अर्जासाठी संयुक्त शुल्क | कायमस्वरुपी परवानगीसाठी जर अर्ज<br>अ) कारखान्याचा परवाना संपल्याच्या तारखेपासून ३ महिन्यापर्यंत संयुक्त शुल्क वसूल करु नये.<br>ब) वरील (अ) मधील सवलतीची मुदत संपल्यानंतर १५ दिवसांपर्यत नूतनीकरण शुल्काच्या १०% भरावे लागतील.<br>क) वरील (ब) मधील मुदतीपासून २ महिन्यापर्यंत (म्हणजे परवाना संपण्याच्या तारखेपासून ५¹/₂ महिन्यापर्यंत ) नूतनीकरण शुल्काच्या १५% भरावे लागतील<br>ड)3 महिन्यांनंतर परंतु परवाना संपण्याच्या तारखेपासून ६ महिन्यांपर्यंत नूतनीकरण शुल्काच्या २०% भरावे लागतील<br>इ) परवाना (कालावधी) संपल्यानंतर ६ महिन्यानंतर परंतु १ वर्षाच्या आत ५०% इतके संयुक्त शुल्क वसूल केले जाईल व त्यानंतर नुतनीकरण शुल्काच्या १००% संयुक्त शुल्क वसूल केले जाईल. | कायमस्वरुपी परवानगीसाठी जर अर्ज<br>अ) कारखान्याचा परवाना संपल्याच्या तारखेपासून ३ महिन्यांपर्यंत संयुक्त शुल्क वसूल करु नये.<br>ब) वरील (अ) मधील सवलतीची मुदत संपल्यानंतर १५ दिवसांपर्यत नूतनीकरण शुल्काच्या १०% भरावे लागतील.<br>क) वरील (ब) मधील मुदतीपासून २ महिन्यापर्यंत (म्हणजे परवाना संपण्याच्या तारखेपासून ५¹/₂ महिन्यापर्यंत ) नूतनीकरण शुल्काच्या १५% भरावे लागतील<br>ड)५¹/₂ महिन्यांनंतर परंतु परवाना संपण्याच्या तारखेपासून ६ महिन्यांपर्यंत नूतनीकरण शुल्काच्या २०% भरावे लागतील.<br>इ) परवाना (कालावधी) संपल्यानंतर ६ महिन्यानंतर परंतु १ वर्षाच्या आत ५०% इतके संयुक्त शुल्क वसूल केले जाईल व त्यानंतर नूतनीकरण शूल्काच्या १००% इतके संयुक्त शुल्क (एक वर्षापर्यंत म्हणजे परवाना कालावधी संपल्यानंतर २ वर्षापर्यंत) वसूल केले जाईल. त्यानंतर सदर परवाना रद्द समजण्यात येईल. | पृष्ठ क्र. टी-३८ वरील मुद्दा क्र.४ वरील खुलाशानुसार.<br>नव्याने प्रस्तावण्यात आलेली बाब |

F:\Factory_Permit_Fees_Statement (2).doc

| अ. क्र. | अधिनियमाचे कलम | तपशील | विद्यमान शुल्काची श्रेणी | | शुल्कांची प्रस्तावित अनुसूची | | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | | | सहाय्यभूत वापराची प्रेरक शक्ती वापरण्यासाठी | | सहाय्यभूत वापराची प्रेरक शक्ती वापरण्यासाठी | | |
| ७.अ | ४७९(२)सह ३९० | ना हरकत प्रमाणपत्र शुल्क | १.०० अश्वशक्ती पर्यंत<br>१.०० ते २.०० अश्वशक्तीपर्यंत<br>२.०० ते ३.०० अश्वशक्ती पर्यंत | ६००<br>११००<br>१५०० | १.०० अश्वशक्ती पर्यंत<br>१.०० अश्वशक्तीपेक्षा जास्त ते २.०० अश्वशक्तीपर्यंत<br>२.०० अश्वशक्ती पेक्षा जास्त ते ३.०० अश्वशक्ती पर्यंत | २५१०<br>४६००<br>६२७० | पृष्ठ क्र. टी-३८ वरील मुददा क्र.५ वरील नमूद खुलाशानुसार |
| ७.ब | ४७९ (२) सह ३९० | ना हरकत प्रमाणपत्र ठेव | १ अश्वशक्तीपर्यंत<br>१.०० ते २.०० अश्वशक्तीपर्यंत<br>२.०० ते ३.०० अश्वशक्ती पर्यंत | ११००<br>२१००<br>२६०० | १ अश्वशक्तीपर्यंत<br>१.०० अश्वशक्तीपेक्षा जास्त ते २.०० अश्वशक्तीपर्यंत<br>२.०० अश्वशक्तीपेक्षा जास्त ते ३.०० अश्वशक्ती पर्यंत | ४६००<br>८७८०<br>१०८७० | |
| ८. | ४७९(२) सह वाचला जाणारा ३९० | कारखान्यांना ३ पाळ्यात काम करण्यास मान्यता देण्यासाठी परवानगी शुल्क | मूळ परवाना शुल्काच्या ५०%<br>टिप :- मूळ परवाना शुल्क म्हणजे नूतनीकरणाच्या वेळी नवीन परवान्याकरिता आकारले जाणारे शुल्क | | मूळ परवाना शुल्काच्या ५०%<br>टिप :- मूळ परवाना शुल्क म्हणजे नूतनीकरणाच्या वेळी नवीन परवान्याकरिता आकारले जाणारे शुल्क | | |
| ९. | ४७९(२) सह वाचला जाणारा ३९० | अतिरिक्त क्षेत्राशिवाय विद्यमान कारखान्यातील वाढ किंवा बदलासाठी परवानगी | ठोक रक्कम रु.२१०० + अतिरिक्त प्रेरक शक्ताकरिता प्रति अश्वशक्ती रु.५/-किंवा किमान रु.५००/-यापैकी जे अधिक असेल ते | | ठोक रक्कम रु.८७८० +प्रस्तावितेल्या अतिरिक्त प्रेरक शक्तीकरिता प्रति अश्वशक्ती रु.२१ /- किंवा किमान रु.२०९०/- यापैकी जे अधिक असेल ते | | |

F:\Factory_Permit_Fees_Statement (2).doc

| अ. क्र. | अधिनियमाचे कलम | तपशील | विद्यमान शुल्कांची श्रेणी | | शुल्कांची प्रस्तावित अनुसूची | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | अनामत रक्कम | विद्यमान अनामत रक्कम | | प्रस्तावित अनामत रक्कम | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १० | ४७९(२)सह ३९० | | कायम स्वरुपी परवाना धारण करणाऱ्या कारखान्याकरिता | तात्पुरता परवाना धारण करणाऱ्या कारखान्या करिता | कायम स्वरुपी परवाना धारण करणाऱ्या कारखान्यांकरिता | तात्पुरता परवाना धारण करणाऱ्या कारखान्यांकरिता |
| | | ५.०० अश्वशक्ती पर्यंत | रु.६००+३५०० (पर्यावरण छाननीकरिता अतिरिक्त अनामत रक्कम) | रु.११०० + ३५०० (पर्यावरण छाननीकरिता अतिरिक्त अनामत रक्कम) | रु.२५१० + १४६३०(पर्यावरण छाननी करिता अतिरिक्त अनामत रक्कम) | रु.४६०० + १४६३०(पर्यावरण छाननी करिता अतिरिक्त अनामत रक्कम) |
| | | ५.०० अश्वशक्ती पेक्षा जास्त व १० अश्वशक्ती पर्यंत | रु.१३०० + ३५०० --" "-- | रु.२६०० + ३५०० --" "-- | रु.५४४०+ १४६३० (पर्यावरण छाननी करिता अतिरिक्त अनामत रक्कम) | रु.१०८७०+ १४६३० (पर्यावरण छाननी करिता अतिरिक्त अनामत रक्कम) |
| | | १०.०० अश्वशक्ती पेक्षा जास्त व ५० अश्व शक्ती पर्यंत | रु.२६०० + ३५०० --" "-- | रु.५१०० + ३५०० --" "-- | रु.१०८७०+ १४६३० (पर्यावरण छाननी करिता अतिरिक्त अनामत रक्कम) | रु.२१३१०+ १४६३० (पर्यावरण छाननी करिता अतिरिक्त अनामत रक्कम) |
| | | ५० अश्वशक्ती पेक्षा जास्त व १०० अश्वशक्ती पर्यंत | रु.५१०० + ३५०० --" "-- | रु.१०२०० + ३५०० --" "-- | रु.२१३१०+ १४६३० (पर्यावरण छाननी करिता अतिरिक्त अनामत रक्कम) | रु.४२६१०+ १४६३० (पर्यावरण छाननी करिता अतिरिक्त अनामत रक्कम) |
| | | १०० अश्वशक्ती पेक्षा जास्त व २०० अश्वशक्ती पर्यंत | रु.१०२०० + ३५०० --" "-- | रु.२०४०० + ३५०० --" "-- | रु.४२६१०+ १४६३० (पर्यावरण छाननी करिता अतिरिक्त अनामत रक्कम) | रु.८५२२०+ १४६३० (पर्यावरण छाननी करिता अतिरिक्त अनामत रक्कम) |

| | | | विद्यमान शुल्काची श्रेणी | | | | | | प्रस्तावित शुल्काची श्रेणी | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४<br>कायमस्वरुपी परवाना धारण करणाऱ्या कारखान्यांकरिता | | | ५<br>तात्पुरता परवाना धारण करणाऱ्या कारखान्यांकरिता | | | ६<br>कायमस्वरुपी परवाना धारण करणाऱ्या कारखान्यांकरिता | | | ७<br>तात्पुरता परवाना धारण करणाऱ्या कारखान्यांकरिता | | |
| | | | अनामत रक्कम | पर्यावरण छाननी करीता अतिरिक्त अनामत रक्कम | | अनामत रक्कम | पर्यावरण छाननी करीता अतिरिक्त अनामत रक्कम | | अनामत रक्कम | पर्यावरण छाननी करीता अतिरिक्त अनामत रक्कम | | अनामत रक्कम | पर्यावरण छाननी करीता अतिरिक्त अनामत रक्कम | |
| १० | | २०० अश्व शक्तीच्या वर | १०२००+<br>प्रत्येक १०० अश्वशक्तीला अथवा त्याच्या भागासाठी रु.६००/- | **अश्वशक्ती**<br>२०१ ४००<br>४०१ ५००<br>५०१ ५०००<br>५००० च्या वर | **रक्कम**<br>१४०००/-<br>१७५००/-<br>३५०००/-<br>७००००/- | २४९००+<br>प्रत्येक १०० अश्वशक्तीला अथवा त्याच्या भागासाठी रु.११००/- | **अश्वशक्ती**<br>२०१ ४००<br>४०१ ५००<br>५०१ ५०००<br>५००० च्या वर | **रक्कम**<br>१४०००/-<br>१७५००/-<br>३५०००/-<br>७००००/- | रु.४२६१० +<br>प्रत्येक १०० अश्वशक्तीला अथवा त्याच्या भागासाठी रु.२५१०/- | **अश्वशक्ती**<br>२०१ ४००<br>४०१ ५००<br>५०१ ५०००<br>५००० च्या वर | **रक्कम**<br>५८४९०/-<br>७३११०/-<br>१४६२१०/-<br>२९२४१०/- | १०४०२०+<br>प्रत्येक १०० अश्वशक्तीला अथवा त्याच्या भागासाठी रु.४६००/- | **अश्वशक्ती**<br>२०१ ४००<br>४०१ ५००<br>५०१ ५०००<br>५००० च्या वर | **रक्कम**<br>५८४९०/-<br>७३११०/-<br>१४६२१०/-<br>२९२४१०/- |

प्रमुख अभियंता (विकास नियोजन)

<u>परिशिष्ट -ब</u>

| अनु.क्र. | वर्णन कारखाना प्रपत्र जारी करणे | मंजुरी व दिनांक | विक्रीकर /सामान्य कर वगळता आकाराची विद्यमान श्रेणी | एसटी/जीटी वगळून आकारांची श्रेणी प्रस्तावित | |
|---|---|---|---|---|---|
| १. | प्रपत्र अ | एमजीसी/एफ/१३६ दि. ३.९.२००१ | १०.०० | वगळले | It is learnt from the Ward Office that Factory Permission and Renewal AMC are now issued through one window system & no form are issued at ward level. |
| २. | प्रपत्र ब | | २०.०० | वगळले | |
| ३. | प्रपत्र ब-१ | | २०.०० | वगळले | |
| ४. | प्रपत्र क | | १०.०० | वगळले | |

प्रमुख अभियंता (विकास नियोजन)